आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक १४ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. भारतीय हवामान विभागाच्या दिडशेव्या स्थापना दिनानिमित्त मिशन मौसमचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन, नागपुरात देखील कार्यशाळेचे आयोजन.

2. सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवसानिमित्त केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव.

3. मकरसंक्रांतीचा राज्यात सर्वत्र उत्साह, नागपूर पोलिसांनी उद्ध्वस्त केला नायलॉन मांजाचा साठा.

4. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्राचा समावेश करून शासनाचे डिजीटल माध्यम धोरण लवकरच तयार करण्यात येणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

हवामान स्थापना दिन

हवामान विभागाचे अंदाज जितके जास्त अचूक होत जातील, तितकंच त्यांच्या सूचनांचं महत्त्व वाढेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारतीय हवामान विभागाच्या दिडशेव्या स्थापना दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम इथं मिशन मौसमचं उद्घाटन आज पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. हे अभियान शाश्वत भविष्यासाठी भारताच्या समर्पणाचं आणि येणाऱ्या आव्हानांसाठी सक्रिय तयारीचं प्रतीक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. गेल्या १० वर्षांत, भारतीय हवामान विभागाच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. हवामानशास्त्र देखील अंतराळ तंत्रज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करत असल्याचं नमूद केलं. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या आयएमडी व्हिजन - २०४७ चं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं. त्यात हवामानाचा अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामान बदल कमी करण्याच्या योजनांचा समावेश आहे. दरम्यान, नागपुरात दिल्लीच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. 'विदर्भातील हवामानशास्त्र विभागाच्या सेवा' या विषयावर कार्यशाळेचा आयोजन करण्यात आलं. हा कार्यक्रम मेट्रोलॉजिकल सेंटर विमानतळ इथं एलआयटी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर अतुल वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. हवामान विभाग आणि सामान्य नागरिक यांचे नाते असल्याचे वैद्य म्हणाले -

*This is a predictive science and based on so many factors. So this always a average prediction. So we have to take it that way. Keeping aside these things, Mosam Vibhag is connected to people more than any other department. रोज़मर्रा की जिंदगी से विभाग जुड़ा है गवर्नमेंट का जो पोस्ट है, रेल्वे है वैसे मोसम विभाग है।*

पंतप्रधान उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. मुंबई इथं नौदलातील आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं जलावतरण त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. नवी मुंबईत खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

<u>सोयबीन मुदतवाढ</u>

सरकारनं आतापर्यंत जवळपास १३ लाख ६८ हजार क्विंटल सोयाबीनची किमान आधारभूत किंमतीनं खरेदी केली असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली. महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत तर राजस्थानात ४ फेब्रुवारीपर्यंत वाढवण्यात आली असल्याचंही चौहान यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

*महाराष्ट्र की तरफ से राज्य सरकार की तरफ से यह मांग आई थी कि सोयाबीन की खरीदी की समय सीमा बढ़ाई जाए । 31 मार्च तक महाराष्ट्र सोयाबीन खरीदना चाहता है तो महाराष्ट्र के लिए भी सोयाबीन की खरीद की समय सीमा बढ़ाकर जो उन्होंने 31 जनवरी तक बढ़ाने की मांग की थी। 31 जनवरी तक हम बढ़ा रहे हैं।सोयाबीन की खरीद अभी लगातार जारी है।*

राज्य सरकारांनी केलेल्या मागणीनुसार खरेदीची मुदत वाढवण्यात आल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मुदतवाढ दिल्या बद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौहान यांचे आभार मानले आहे.

सेना निवृत्त कर्मचारी दिवस

आपल्या सेवा काळात संरक्षण दलात सैनिकांनी जे सेवा कार्य केले ते आपण कधीच विसरू शकत नाही त्यांच्यामुळेच या देशाचा गौरवशाली इतिहास आणि परंपरा शाबूत आहेत आणि आपण सुरक्षित आहोत. त्यांच्या कार्याचा गौरवाचा दिन म्हणून आजचा सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस आपण साजरा करत असल्याचं प्रतिपादन नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या वायुसेना नगर येथील मेंटेनन्स कमांडच्या मुख्यालयात आयोजित कार्यक्रमाप्रसंगी केलं.

*हमारे सुरक्षा के लिए हमारे शुर जवानों ने देश के लिए जान भी दी, बलिदान भी दिया और उन्हीं के कारण आज हम देश में सुरक्षित हैं। चाहे दुश्मनों से लड़ाई हो, चाहे आतंकवाद से लड़ाई हो, चाहे नेचुरल कैलेमिटीज हो, हर समय हमारे शुर सैनिक, हमारे समाज की मदद करते हैं और हमारे जीवन को सुरक्षित रखते हैं। कुछ लोग देश के लिए बलिदान भी उनका होता है और कुछ लोग निवृत्त होते हैं। उन सब लोगों को याद करने के लिए आज का ये नौवां हमारा वेटरन डे है। मैं आज के दिन में तमाम सैनिकों को अधिकारियों को अभिवादन करता हूँ, वंदन करता हूँ और उनके बलिदान, उनका कार्य, हमारा देश, हमारा समाज हर समय याद रखेगा।ऐसा विश्वास व्यक्त करता हूँ।*

आपल्याला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण बनणे आवश्यक असून विश्व  शांती आणि अहिंसा प्रस्थापित करण्यासाठी संरक्षण दलाच्या तिन्ही दलाची भूमिका महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितलं .कारगिलच्या सोनमर्ग येथील  बोगद्याच्या उद्घाटन प्रसंगी उणे 4 अंश सेल्सिअस इतक्या कमी तापमानात आणि  कठीण परिस्थितीत सैनिक आपल्या देशाचं रक्षण करतात हे आपण अनुभवले असल्याचे गडकरी यांनी यावेळी नमूद केला. या कार्यक्रमाप्रसंगी सशस्त्र दलातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी कल्याणकारी योजनांची मदत कक्ष स्थापन करण्यात आला असून याप्रसंगी मोठ्या प्रमाणात निवृत्त कर्मचारी उपस्थित आहेत .या दिवसानिमित्त नागपूरच्या दाभा आणि फुटाळा परिसरात असलेल्या वायुसेनेच्या मेंटेनन्स कमांड  शौर्य स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्त एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ विजयकुमार गर्ग यांच्यासोबत गडकरी यांनी वायुसेना नगर येथील शौर्य स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना श्रद्धांजली वाहली. या कार्यक्रमानिमित्त शहीद वीरमाता आणि वीर पत्नीचा सत्कार देखील गडकरींच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी बोलताना एअर ऑफिसर कमांडिंग चीफ विजयकुमार गर्ग यांनी सांगितलं की एक सैनिक हा कधीच निवृत्त होत नाही तो सदैव एक सैनिकच राहतो. एखाद्या जिल्ह्यात असलेला निवृत्त सैनिक हा एखाद्या सेने प्रमाणे असतो असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं. कुठल्याही नैसर्गिक आपत्ती प्रसंगी मदतकार्यात किंवा परदेशातून

भारतीयांना सुरक्षित रित्या परत आणण्यामध्ये आपल्या सैनिकांची भूमिका सर्वश्रुत आहे असे देखील त्यांनी सांगितलं.

मकरसंक्रांत-कुंभ

सूर्याचा मकर राशीत प्रवेश तसंच दक्षिणायनातून उत्तरायणात संक्रमणाचं पर्व, मकरसंक्रांतीचा सण आज साजरा होत आहे. या दिवशी परस्परांना तीळगुळ वाटपाचा तसंच महिलावर्गात सौभाग्यदानासह मातीच्या सुगड्यांमधून विविध वस्तूंचं वाण देण्याचा प्रघात आहे. दक्षिण भारतात पोंगल तर ईशान्यआणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू म्हणून हा दिवस साजरा केला जातो.राज्यात ठिकठिकाणच्या मंदिरांमधे संक्रांतीनिमित्त देवदर्शनासाठी गर्दी झाली आहे. मंदिरांना सजावट करण्यात आली आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीत रामकुंडावर स्नानासाठी गर्दी झाली आहे. ठिकठिकाणी पतंग उडवण्याचा खेळ रंगला आहे. घातक मांजाच्या वापरावर बंदी घालण्यात आली असून पोलीस आणि प्रशासनानं अनेक ठिकाणी कारवाई करुन नायलॉन मांजाचे साठे जप्त केले आहेत. नागपूर शहरात विवीध कारवाईत जप्त केलेला नायलॉन मांजा पोलीसांकडून नष्ट करण्यात आला. नागपुरातल्या जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीत इंदोरा मैदानात रोड रोलर फिरवून जप्त केलेला नायलॉन मांजा नष्ट करण्यात आला. जवळपास १८ लाख किमतीचा नायलॉन मांजा पोलीसांकडून नष्ट करण्यात आला. मकर संक्रांतीला पतंगबाज नायलॉन मांजा वापरतात. हा नायलॉन मांजा अनेकदा जीवघेणा ठरतो. या जीवघेण्या नायलॉन मांजापासून कर्मचाऱ्यांचा बचाव व्हावा या उद्देशाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कर्मचाऱ्यांच्या दुचाकीला तारांचे रिंगण लावण्याचा उपक्रम कर्मचारी मित्र परिवाराच्यावतीने राबविण्यात आला. मकर संक्रांतीच्या पुण्यपर्व काळात प्रयागराज इथं महाकुंभमेळयात आज अमृत स्नान होत आहे. आज पहाटेपासून विविधसाधू आखाड्याच्या संत महंतांनी शाही स्नान करुन या पर्वणीला सुरुवात केली. एकंदर १३ आखड्यांचेप्रमुख संत- महंत आणि त्यांच्या असंख्य शिष्यगणांनी, साधुंनी त्रिवेणी संगमावर अमृत स्नान केलं. सर्वप्रथम स्नान करण्याचामान महानिर्वाणी पंचायतनी आखाड्याला मिळाला, तर शेटवचं शाही स्नान पंचायतनी निर्मलआखाड्याने केलं.

नॉयलॉन मांजा

मकरसंक्रांतीच्या पूर्वसंध्येला भंडारा जिल्ह्यात नॉयलॉन मांजाने दुचाकीस्वाराचा गळा कापला गेल्याची घटना घडली. लाखनीच्या उड्डाण पुलावरून गोरेगावकडे जाणाऱ्या २४ वर्षीय युवकाच्या गळयात नॉयलॉन मांजा अडकल्याने गळा कापला गेल्याने प्रचंड रक्तस्राव होऊन तो उड्डाण पुलावरच पडला. काही नागरिकांनी तत्काळ त्याला रूग्णालयात पोहचविण्याचे त्याचा जीव वाचल्याचे सांगण्यात आले.

## डिजीटल माध्यम धोरण

शासनाच्या विविध योजना, उपक्रम, शासकीय निर्णय इत्यादी माहिती लोकांपर्यंत जलदगतीने आणि प्रभाविरित्या पोहोचविण्यासाठी शासनाचे डिजीटल माध्यम धोरण लवकरच तयार करण्यात येईल. यासाठी यापुढील काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्राचा वापर करण्यात येईल. त्याचबरोबर विविध नवमाध्यमांचा प्रभावी वापर करून शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई मध्ये सांगितले. राज्य शासनाच्या शंभर दिवस आराखड्यासंदर्भात आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा आढावा घेतला.

******